
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

# विदर्भ-पंढरी



REFBK-0011395

मराठवाडा-विदर्भ परिसर



* * * * सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : विदर्भ परिसर : २१

# विदर्भ - पंढरी

## कौंडण्यपूर

तरी ऐकावें निर्धारीं ।
वसिष्ठातीरीं कौंडण्यपुरीं ।
क्षेत्र जुनाट असे भारी ।
तेथें करीं तूं रहिवास ॥
कार्तिक शुद्ध चतुर्दशीपासून ।
मी स्वयें येईन दिवस तीन ॥
दहीहांडी झालिया निघोन ।
परतोनि जाईन मी ॥

(–संत सदारामांना श्रीविठ्ठलाचें वचन)

प्र. अ. भारती

किंमत
६५
नये पैसे

REFBK-0011395

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : २४४

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : २९
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचूरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्काति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांचीं राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सर्व अंगाचें विदर्भानें पोषण केलें आहे.

' वैदर्भी रीति ' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भांतीलच.

— श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृति-केंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.

११३८५

# विदर्भ-पंढरी

## कौंडण्यपूर

### विदर्भाची पंढरी :

भागवतधर्माच्या इतिहासांत कितीतरी नवीं तीर्थें आणि श्रद्धाकेंद्रें निर्माण झालीं. ज्ञानेश्वरांनीं वारकरी संप्रदायाच्या ध्वजाखालीं सर्व जाती-जमाती एकत्र आणल्या व ईश्वरभजनीं लावल्या. भक्त पुंडलिकाच्या आज्ञेनें, एका विटेवर उभा राहणाऱ्या पांडुरंगाला, आपल्या भाविक भक्तांची दया आली. दूरदूरवरून जंगलें-अरण्यें तुडवीत, पाणीपावसांत हाल भोगीत आपल्या दर्शनाला यावें लागतें, हें पाहून कीं काय, भक्तासाठीं दामाजी होणाऱ्या पांडुरंगानें, प्रिय भक्त सदारामास कौंडण्यपूर येथें पाठवून, विदर्भांत प्रतिपंढरी निर्माण करावयास लावली. वर्षांतून तीन दिवस विठ्ठलानें कौंडण्यपुरास येण्याचें कबूल केलें. वसिष्ठेच्या तीरावर वसलेलें कौंडण्यपूर हेंच ठिकाण सुचविण्यांत, पुरातन तीर्थक्षेत्रांची परंपरा राखणें आणि सासुरवाडीच्या प्रेमाचा ओलावा हेंच कारण असावें.

तेव्हांपासून वर्धेचें (वसिष्ठा हें पौराणिक नांव) वाळवंट पंढरपूरच्या चंद्रभागेप्रमाणें विठ्ठलनामाच्या गजरानें गजबजूं लागलें. असें हें पौराणिक काळापासून सांस्कृतिक परंपरा असलेलें व देवादिकांच्या दर्शनानें व पदधूलीनें पावन झालेलें त्या वेळचें वैभवशाली 'कुंडिननगर' आज कौंडण्यपूर नांवानें पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ओळखलें जातें.

वर्धेच्या पूर्वेकडील पैलतीरावरून जर आपण पाहिलें तर पंढरपुराप्रमाणें लहानमोठीं विखुरलेलीं अनेक देवळें दिसतात. त्या वैभवशाली पौराणिक काळांत ज्या भागांत राजमंदिरें व राजमहाल असणें शक्य आहे, त्या भागाकडे पाहिलें तर लहान-मोठ्या पण सारख्या उंचीच्या टेकड्या आपलें मन आकर्षून घेतात. आणि त्यांकडे पाहून आपल्याला पौराणिक काळाच्या सुखद स्मृति होऊं लागतात.

**दमयंतीचें माहेर :**

आज जरी आपणांस कौंडण्यपूर हें लहानसें खेडें दिसत असलें, तरी राम–अवतारापूर्वीं विदर्भ देशाची राजधानी या गौरवशाली नांवानें ओळखलें जाणारें हें नगर वर्धा नदीच्या कांठावर वसलेलें आहे. अमरावतीवरून मोटार किंवा रेल्वे मार्गानें येथें जातां येतें. अमरावती जिल्ह्यांतील चांदूर तालुक्यांत अमरावतीपासून याचें सरळ अंतर २६ मैल आहे.

ज्या गांवच्या मातींत एके काळीं दमयंती-रुक्मिणीसारखीं स्त्रीरत्नें खेळलीं, बागडलीं; ज्या नगरींत एके काळीं इंद्रादिक देवसुद्धां सामान्य राजे होऊन राजसभेंत बसले; ती भूमि म्हणजे एक पवित्र वास्तु आहे असें कोण म्हणणार नाहीं ?

भीमक राजानें आपल्या कन्येचें स्वयंवर मांडलें त्या वेळीं दमयंतीच्या सौंदर्यानें नळाप्रमाणें इंद्रादिक देवसुद्धां मोहून गेले. स्वयंवराची वार्ता ऐकून नळाप्रमाणें–

**वरुण पावक इंद्रही मिळाले ।**
**असे चौघेही रथारूढ झाले ॥**
**महीलोकासी यावया निघाले ।**
**तया कुंडिननगरासमीप आले ॥**

अशा रीतीनें स्वयंवराकरितां आलेल्या वरुण–वायु–यम–इंद्र अशा महापराक्रमी देवादिकांना सुद्धां दमयंती आपणांस माळ घालील याची खात्री वाटेना. कारण स्वयंवरापूर्वींच हंसानें नल-दमयंतीच्या दोघांच्याहि मनांत एकमेकांबद्दल अनुरागाची, प्रीतीची ज्योत उजळली होती. त्यांनीं मनांत एकमेकांना वरलें होतें. आणि म्हणून इंद्रादिक देवांनीं नळाला मध्येंच अडवून मोठ्या चातुर्यानें त्यालाच आपला दूत म्हणून दमयंतीकडे पाठविलें. पण त्या कामगिरींत नळाला यश मात्र मिळालें नाहीं. अखेर–

**इंद्रादिक तेही अधिप । धरूनी आले नळरूप ॥**
**सभे बैसले अमूप । जेथें भूप शोभती ॥**

दमयंती आपणांस मिळावी म्हणून, रूप बदलून सामान्य राजांमध्यें इंद्रादिक देव येऊन बसले. जिनें आपल्या मोहानें देवांना देवपण विसरावयास लावलें त्या दमयंतीच्या चातुर्यापुढें त्यांना आपलें ढोंग बाजूला सारून अखेर वधूवरांना शुभाशीर्वाद द्यावे लागले. देवांना देवपण विसरावयास लावणारी दमयंती, पतीकरितां राजमहाल, स्वर्गसुख लाथाडून रानें, वनें तुडवणारी दमयंती, तिचें हें माहेर ! इंद्रादिक देवांच्या पदधूलीनें पावन झालेली नगरी म्हणजेच आजचें कौंडण्यपूर !


––आणि त्यानंतर कृष्णावतारांत ......

## गिरिजेचें देऊळ :

गांवाच्या दक्षिण बाजूला एक फर्लांगावर गिरिजेचें देऊळ आहे. देवळाच्या चित्रांवरून आपणास असें वाटेल कीं, एक लहानशी टेकडी, त्यावर लहानसें देऊळ आणि आजूबाजूला बेढब झाडाझुडपांनीं व्यापलेलें रान. पण आपण थोडा वेळ शांत मनानें गिरिजेसमोर जाऊन बसा. लगेच तुमचें मन पौराणिक काळांत वावरूं लागेल. मग त्या वैभवशाली इतिहासाचा

चित्रपट तुमच्यापुढून आपोआप जसजसा सरकूं लागेल तसतसे आपण श्रीकृष्णावताराच्या काळांत कल्पनेच्या भराऱ्या मारून ती भव्यता, दिव्यता पाहूं लागूं.

जिथें आज आपणांस बेढब झाडेंझुडपें दिसतात, तिथेंच त्या रानांत भीमक राजाचें नयनमनोहर विविध रंगांच्या, गंधांच्या फुलांनीं बहरलेलें उद्यान होतें. गिरिजा तर त्यांची कुलदेवीच. काय थाटमाट असेल त्या वेळीं तिथला! आणि येथूनच तर भगवान् श्रीकृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें, तो



गिरिजेचें देऊळ

इतिहास मग आपल्याला आठवूं लागतो. ज्या नगराच्या पावन भूमींत—

हे मूळपीठनिवासिनी माया। जिनें निर्मिलें देवत्रया ॥
इच्छामात्रें महत्कार्या। घडी मोडी ब्रह्मांडें ॥
अनंतशक्तीची स्वामिनी। जे आदिपुरुषाची मूळध्वनी ॥
महामाया प्रणवरूपिणी। भीमके उदरीं अवतरली ॥

आणि असें जिचें सौंदर्य—

तप्त सुवर्ण जैसें सुरंग। तैसें रुक्मिणीचें दिव्यांग ॥
आकर्ण नेत्र सुरेख चांग। मुखमृगांक कोण वर्णी ॥

त्या रुक्मिणीचें रूप आणि रूपापेक्षांहि तिचें निर्मल अन्तरंग यांची कीर्ति श्रीकृष्णानें ऐकली. तेव्हांपासून श्रीकृष्णाच्या

मनांत रुक्मिणीचा ध्यास सुरू झाला; आणि तिच्याशींच विवाह करीन, असा संकल्पहि उदय पावला.

तशीच भक्ति रुक्मिणीची श्रीकृष्णावर जडली होती. तिनेंहि मनोमन श्रीकृष्णाला वरलें होतें.

**रुक्मिणी-स्वयंवर :**

रुक्मिणी मोठी झाल्यावर भीमकानें तिचें स्वयंवर ठरविलें. सर्व देशांच्या राजांना निमंत्रणपत्रिका पाठविल्या—पण एकटी मथुरा वगळून. रुक्मीनें मुद्दामच श्रीकृष्णाला निमंत्रण-पत्रिका पाठविली नाहीं. रुक्मी हा रुक्मिणीचा वडील भाऊ होता. त्याच्या हातींच राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें होतीं. भीमक हा नांवापुरताच राजा होता. रुक्मीपुढें भीमकाचें कांहीं चालेना. रुक्मी हा जरासंध-शिशुपाल यांचा पक्षपाती व श्रीकृष्णाचा द्वेष्टा होता. भीमकाला श्रीकृष्णासारखा जांवई मिळावा असें वाटत असणें साहजिक आहे, पण तो करणार काय ?

स्वयंवराची बातमी श्रीकृष्णाला कळतांच, आमंत्रण नसतांहि आपल्या यादव सैन्यासह श्रीकृष्ण कुंडिननगरास आला. श्रीकृष्ण आला, आतां रुक्मिणी त्यालाच माळ घालील, म्हणून जरासंध व शिशुपाल यांच्या सल्ल्यानें रुक्मीनें तें स्वयंवर नसत्या कुरापती काढून व मोठें युद्ध होणार असा कांगावा करून रद्दीत केलें.

त्यानंतर वारंवार पराभूत झालेल्या दुष्ट प्रवृत्तीच्या जरासंधाच्या सल्ल्यानें रुक्मीनें रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशीं ठरविला. पराजयाचा सूड घेण्याचें समाधान मिळावें, श्रीकृष्णाचा अपेक्षाभंग व्हावा, मानखंडना व्हावी, म्हणून जरासंधानें रुक्मिणीचा विवाह मुद्दामच श्रीकृष्णद्वेष्ट्या शिशुपालाशीं ठरविला होता.

हें ऐकून भीमकाला वाईट वाटलेंच, पण थोडें समाधानहि वाटलें. युद्धाची रणधुमाळी माजणार नाहीं, या भावनेनें त्यानेंहि या विवाहाला संमति दिली.

पण बिचारी रुक्मिणी मात्र वेडीपिशी बनली. तिला काय करावें हें सुचेना. अखेर एके दिवशीं कुलाचाराचे सर्व संकेत झुगारून देऊन तिनें आपल्या एका विश्वासु–पित्यासमान प्रेम करणाऱ्या ब्राह्मणाकरवीं श्रीकृष्णाला पत्र लिहिलें. त्यांत तिनें आर्जवून श्रीकृष्णाला विनंती केली कीं–

" हे श्रीहरि ! मी प्राणाच्या दिवल्या तेववून तुझी वाट पाहत आहें. एका क्षणाचाहि उशीर केलास तर माझ्या लेखीं सृष्टी बुडाली. "

आणि त्यांतच संकेतहि दिला कीं, " विवाहापूर्वी कुलाचाराप्रमाणें मी गिरिजेच्या पूजेकरितां देवळांत येईन तेव्हां तूं माझें हरण कर. "

श्रीकृष्णाला पत्र मिळतांच श्रीकृष्ण कुंडिननगरांत येऊन दाखल झाला. श्रीकृष्ण एकटाच गेला; पण तिथें युद्ध झाल्याशिवाय रहाणार नाहीं, हें माहीत असल्यामुळें बलराम लगेच यादव सैन्य घेऊन श्रीकृष्णापाठोपाठ आला.

विवाहघटिका जवळ येत चालली, तों तों नगर राजांनीं व सैन्यानें गजबजूं लागलें. नगरांत आनंदाला, उत्साहाला अपार भरतें येऊं लागलें. नाना वाद्यांच्या मधुर स्वरांनीं सारें वातावरण दुमदुमून गेलें. श्रीकृष्ण आला, ही बातमी हां हां म्हणतां साऱ्या नगरांत वाऱ्यासारखी पसरली. भीमक राजाला हें कळतांच त्यानें सामोरें येऊन श्रीकृष्णाचें स्वागत केलें. व श्रीकृष्णाच्या इच्छेप्रमाणें गिरिजेच्या उद्यानांतच त्याची रहायची व्यवस्था करून भीमक परत गेला.

विवाहाचा मंगल दिवस उजाडला. रुक्मिणी मोठ्या आनंदानें विवाहापूर्वीचे विधि सख्या सांगतील त्याप्रमाणें

करीत होती. कुलाचाराप्रमाणें सख्यांनीं वेढलेली रुक्मिणी, अलंकारांनीं नटलेली रुक्मिणी, गिरिजेच्या पूजेकरितां— मंदगतीनें मंदिराकडे निघाली. पण आधींच्या श्रीकृष्णाच्या पराक्रमानें धडकी भरलेल्या सर्व श्रीकृष्णद्वेष्टया राजांनीं, जरासंध-शिशुपाल यांनीं आपआपल्या सैन्यानें गिरिजेचें देऊळ वेढून टाकलें. रुक्मीहि आपलें सर्व सैन्य घेऊन तयारच होता. ठिकठिकाणीं त्यानें आधींच नाकेबंदी करून ठेवली होती— कदाचित् कृष्ण रुक्मिणीला पळवून नेऊं लागला तर त्याला अडवितां यावें म्हणून! रुक्मी तर प्रतिज्ञा करूनच निघाला होता कीं, रुक्मिणीला देवळांतून परत आणून शिशुपालाशींच तिचा विवाह करीन, नाहींतर पुन: राजधानींत परत येणार नाहीं. देवळाभोंवतीं सैन्यसागरच पसरला होता. केवळ रुक्मिणीला परत येण्यापुरता मार्ग काय तो मोकळा होता. रुक्मिणीनें गिरिजामातेची पूजा केली, प्रार्थना केली आणि कमलपुष्पांची माळ देवीला वाहिली. त्याबरोबर देवीनें प्रसन्न होऊन तीच माळ कृष्णाला घालण्याकरितां रुक्मिणीला प्रसाद म्हणून परत केली. रुक्मिणीला खूप आनंद झाला. देवीचा आशीर्वाद घेऊन रुक्मिणी दारांत आली. त्या सैन्यसागरांत आपल्या श्रीकृष्णाला ती भिरभिरत्या नजरेनें शोधूं लागली. तोंच त्याच लहानशा मार्गानें एक तेजस्वी रथ वाऱ्याच्या गतीनें देवळाजवळ आला. रुक्मिणीनें सख्यांसमक्ष ती माळ श्रीकृष्णाच्या कंठांत घातली. त्याबरोबर श्रीकृष्णानें रुक्मिणीला रथांत घेऊन, क्षणाचाहि विलंब न लावतां त्या सैन्यदुर्गांतून आपला रथ बाहेर काढला आणि मथुरेच्या दिशेनें भरधांव हाकला. क्षणभर सारें सैन्य मंत्रमुग्ध होऊन काय घडलें म्हणून पहातच राहिलें! पण लगेच एकच रणधुमाळी माजली.

रुक्मी आपलें सैन्य घेऊन श्रीकृष्णामागें धावला. श्रीकृष्णाच्या पराक्रमी यादव वीरांनीं सर्वांना पळतां भुई थोडी केली. श्रीकृष्ण-रुक्मीचें जोरांत युद्ध झालें, पण अखेर

श्रीकृष्णानें रुक्मीला पराजित केलें. त्याचे हातपाय बांधून, अर्धवट दाढी-मिशी कापून त्याची विटंबना केली. पण रुक्मिणी व बलराम यांचे म्हणण्यावरून त्याला जीवदान देऊन सोडून दिलें. रुक्मी झालेल्या विटंबनेनें वैतागला—आतां तो कोणत्या तोंडानें राजधानींत परत जाणार? तो तर प्रतिज्ञा करून निघाला होता. मग त्यानें राजधानींत परत न जातां चार योजनें दूर म्हणजे आजच्या कोष्टकाप्रमाणें ३२ मैलांवर 'भोजकट' नांवाचें नगर वसवून तो तिथें राहिला. त्यालाच आतां 'भातुकली' असें म्हणतात. तें अमरावतीपासून पश्चिम दिशेला आठ-दहा मैलांवर आहे.

असें म्हणतात कीं, श्रीकृष्ण रुक्मिणीला घेऊन जात असतां कौंडण्यपुरापासून १०–१२ मैलांवर जें मालधूर म्हणून खेडें आहे तिथें श्रीकृष्णानें रथाची 'धूर' घेतली. रुक्मिणीला खूप तहान लागली होती म्हणून तिथेंच एक बाण मारून पाणी काढलें. तेव्हांपासून त्या गांवाला मालधूर असें नांव पडलें. ती बाण मारल्याची जागा म्हणजे अजूनहि चांगली असलेली पण न बांधलेली विहीर! तिचें पाणी खूप स्वादिष्ट असून आजपर्यंत कधींच आटलेलें नाहीं. सर्व गांवाला तिचेंच पाणी उपयोगांत येतें. आणि नवल हें कीं, त्या विहिरींत साप आहेत, कधीं कधीं भांड्याबरोबर ते वरहि येतात, पण त्यांनीं अजून कोणाला इजा केल्याचें ऐकिवांत नाहीं.

**पौराणिक खुणा :**

एकट्या गिरिजेच्या देवळाशिवाय तिथें आज पौराणिक खूण म्हणून दुसरी कोणतीहि वास्तु नाहीं. पण पूर्वी येथें राजमंदिरें, राजमहाल वगैरे असल्याचा भास कांहीं टेकड्या आजहि करून देतात. त्या टेकड्यांच्या पोटांत अल्पस्वल्पशा खुणा दडून असाव्यात असें वाटतें. या स्थळाशिवाय इतर भागांतील टेकड्यांपेक्षां, वर्धेच्या पश्चिम किनाऱ्यानें व गांवाच्या दक्षिण बाजूला असलेल्या टेकड्या कांहींशा वेगळ्याच

वाटतात. आपण जर या टेकड्यांचें निरीक्षण केलें तर, कुठें दगडांच्या भिंतीप्रमाणें प्रमाणबद्ध थर दिसतात, तर कुठें भव्य विटांच्या बांधकामाचे थर दिसतात. त्या विटा सरासरीनें २ फूट रुंद व ४–४॥ फूट लांब असाव्यात. टेकडीच्या पृष्ठभागावर जर आपण फिरलों तर, चुन्यासारखी पांढरी व सिमेंटप्रमाणें कणखर माती सर्वत्र आढळते.

असें म्हणतात कीं, नगरचें नगर पालथें करून उध्वस्त करण्यांत आलें होतें आणि त्याचा प्रत्यय म्हणून, जें कांहीं खोदकाम विशिष्ट जागीं झालें त्या ठिकाणीं प्रत्येक वस्तु पालथीच निघाली आहे–मग ती मूर्ति असो वा भांडें !

पुरातन काळाची साक्ष पटविणारी अशी एक रेखीव मनोहर मूर्ति मात्र आज श्रीदत्तमंदिरांत ठेवलेली आहे आणि अर्धा भाग तुटलेली एक मूर्ति पुंडलिक कुंडाजवळ आहे. सदर मूर्ति दाढीसह आहे म्हणून ती कोणाची असावी असा भ्रम पडतो. सदर टेकड्यांच्या खोदकामास सरकारनें बंदी केलेली आहे.

## पंढरपूरचें प्रतिरूप :

पौराणिक काळांतील पवित्र वसिष्ठा व आजच्या वर्धा नदीच्या पूर्वतीरावर म्हणजे वर्धा जिल्ह्याच्या सरहद्दीवरून उभे राहून पाहूं लागलों कीं, समोरच्या किनाऱ्यानें विखुरलेलीं लहान-मोठीं देवळें पाहून क्षणभर असें वाटल्यावांचून रहात नाहीं कीं चंद्रभागेच्या पैलतीरावरून आपण पंढरपूर तर पहात नाहीं ना ? पंढरपूरचें प्रतिरूप वाटावें असाच देखावा तो दिसतो. श्रीदत्ताचें मंदिर, महादेवाचें मंदिर, मध्येंच मुसंडी मारलेलें जैनांचें मंदिर, भव्य व आकर्षक वाटावें असें विठ्ठलमंदिर, घराप्रमाणें पडकेंसें दिसणारें लक्ष्मीनारायणमंदिर व बाजूच्या टेकडीवर दूर एकटेंच उभें असलेलें गिरिजेचें देऊळ.

आणि त्यासमोरच्या टेकडयांवर कुतूहल जागृत करणारीं चांभार-मातंग-हरिजन यांनीं बांधलेलीं स्वतंत्र तीन देवळें दिसूं लागतात.

**पुंडलिक कुंड :**

आपण कौंडण्यपुरांत येण्याकरितां निघतों. नदीचें विशाल वाळवंट, प्रवाह ओलांडून किनाऱ्यावर येत नाहीं तोंच, वर्धा नदीनें दीड मैलावर मुसंडी मारून निर्मिलेल्या उपपात्रांत, जिथें गांवासमोर संगम होतो तिथें, हौदासारखें चौफेर दगडांनीं बांधलेलें कुंड नजरेंत भरतें. त्याला पुंडलिक कुंड असें म्हणतात. याच्या पृष्ठभागावर महादेवाची पिंड आहे. हें कुंड फार पुरातन असून हेंच येथील सर्वांत महत्त्वाचें ठिकाण मानण्यांत येतें. प्रत्येक यात्रेकरू प्रथम इथलें तीर्थ व दर्शन घेतो.




पुंडलिक ंड

आजवरच्या वर्धेच्या महापुरांतून तें जसेंच्या तसें टिकून राहिलें आहे. याच कुंडाच्या जवळ तो अपूर्व डोह आहे—ज्या डोहांतून कौंडण्यपुराला पौराणिक काळानंतर पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून दिव्यता देणारा व येथें पांडुरंगाचें वर्षांतून तीन दिवस वास्तव्य घडवून आणणारा योगीपुरुष या भूलोकीं आला.

## विठ्ठलाचें मंदिर :

त्यानंतर पायऱ्या चढून आपण विठ्ठलाच्या मंदिराजवळ येतांच बाहेरच्या महाद्वाराजवळ एक लहानशी समाधि दिसते. ती नाथ संप्रदायांत होऊन गेलेल्या चौरंगीनाथाची आहे, असें म्हणतात. ती समाधि ओलांडून आपण देवळाच्या आवारांत पाऊल टाकतांच विठ्ठलाचें भव्य व आकर्षक देऊळ पाहून समाधान वाटतें. पण येथील सर्वच देवळांची सहा-सात वर्षांपूर्वींची अवस्था व पवित्र ठिकाणांचा दुरुपयोग ऐकून मन खिन्नतेनें भारावून जातें. आणि वाटूं लागतें कीं, हिंदु माणसाच्या मनांतील धर्मश्रद्धा इतकी कां बरें पोखरून निघावी ? पण लगेच मनावर आलेली खिन्नता, आवारांतील व्यवस्थित लावलेलीं फुलझाडें, देवळांची अंतर्बाह्य सजावट पाहून विरून जाते. याचें कारण श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीं या पवित्र तीर्थक्षेत्रांकडे वळविलेली कृपादृष्टि हें आहे. तसेच वैराग्यमूर्ति श्री गाडगे महाराज यांनीं यात्रेनिमित्त येऊन आपल्या गोड अमृतवाणीनें केलेल्या लोकजागृतीमुळें आतां येथील सर्वच देवळें सुव्यवस्थित दिसतात.

देवळांत प्रवेश करतांच मंदिराच्या गाभाऱ्यांत चार समाध्यांचें दर्शन होतें. त्या चार समाध्या म्हणजे (१) वैराग्यमूर्ती श्री सदाराम महाराज, (२) विरक्त योगी पुरुष बैरागी महाराज, (३) दीनानाथ महाराज आणि (४) एकनाथ महाराज यांच्या होत.



विठ्ठलमंदिर

या समाध्यांपैकीं एका समाधींत चिरनिद्रा घेणाऱ्या सदारामांनींच, पौराणिक काळानंतर नामशेष झालेलें कुंडिन-नगरीचें वैभव, महत्त्व आणि पुरातन वराहतीर्थाचें श्रेष्ठत्व आपल्या पुण्याईनेंच कौंडण्यपुरास पुन: प्राप्त करून दिलें--त्याला विदर्भांतील पंढरपूर बनविलें.

## बैरागी महाराज :

आपल्या भक्तीनें पांडुरंगाशीं प्रत्यक्ष बोलणारे श्रीसंत सदाराम महाराज या भूलोकावर येण्यास बैरागी महाराज हेच कारणीभूत आहेत. ते विरागी वृत्तीचे साधुपुरुष होते म्हणून त्यांना बैरागी महाराज हेंच नांव पडलें. त्यांचें खरें नांव कोणालाच माहीत नाहीं. अंदाजें सव्वादोनशें वर्षांपूर्वी बैरागी महाराज वर्धेच्या तीरावर कौंडण्यपूर येथें रहात होते. ते नेहमीं भटकत असत. समोर दिसणाऱ्या आबालवृद्धापासून सर्वांनाच ते 'सदाराम' या एकाच नांवानें संबोधीत. त्यांचा आवडता छंद म्हणजे गांवांतील सर्व जाती-जमातींचीं मुलें एकत्र जमवून त्यांच्याबरोबर खेळणें, त्यांच्यांत समरस होणें. ठरल्या-प्रमाणें रोज मुलें दुपारीं खेळायला येत व सायंकाळीं घरीं परत जात. पण कांहीं दिवसांनीं त्या मुलांमध्यें--

**परी एक अष्ट वर्षाचें मूल। त्याची कांति दिसे सोज्वल ॥**
**कोपीन मेखला प्रांजल। भाळ विशाल तयाचें ॥**

असा तो तेजस्वी आठ वर्षांचा मुलगा इतर मुलांबरोबर रोज खेळायला येऊं लागला. बैरागी महाराजांनीं त्याची बरीच चौकशी केली; पण तो कोण-कुणाचा, हें कोणालाच माहीत नव्हतें. अखेर बैरागीमहाराजांनीं त्या तेजस्वी मुलाचा शोध लावण्याचा निश्चय केला.

एके दिवशीं सायंकाळीं मुलें घराकडे परतलीं. तो मुलगा मात्र गांवांत न जातां नदीतीरानें जाऊं लागला. त्याच्यामागें

११३९५

बैरागी महाराजहि त्याला न कळत जाऊं लागले. थोड्या अंतरावर त्या मुलानें पाण्यांत प्रवेश केला. महाराजहि त्या मुलामागे जाऊं लागले. मुलगा पाण्यांत सहजतेनें जात होता. खोल पाण्यांत गेल्यावर एका बाजूला एक सुंदर दरी होती. त्या दरींतून मुलानें आंत प्रवेश केला. त्याच्या मागोमाग महाराजहि आंत गेले, तों नवलानें पहातच राहिले. दरीच्या आंत कांहीं अंतरावर कांचनमय महाल होता आणि त्या महालांत—

**बहु ऋषींचा समुदाय । सर्व दिसती एकमय ।**
**सदा स्वाहाकार होय । तेथें काय न्यून असे ॥**

अशा त्या महालांतील तेजस्वी ऋषींच्या समुदायांत तो मुलगा स्वैर वावरूं लागला. पण लगेच दूर उभे राहून पाहणारे बैरागी महाराज ऋषींच्या नजरेला पडतांच प्रथम ते त्या मुलावर खूप रागावले आणि त्यांनीं त्याला बजावलें कीं, "तूं आपल्याबरोबर मृत्युलोकींचा माणूस आणलास. तुला आतां येथें रहातां येणार नाहीं. जा . . . परत जा." हें ऐकून त्या मुलाला फारसें दुःख झालें नाहीं. उलट तो लगेच परतूं लागला. जणुं त्याला मृत्युलोकाची ओढ लागली होती.

हें पाहून बैरागी महाराजांना मात्र खूप दुःख झालें. आपला दोष आणि शिक्षा मात्र निर्दोष मुलाला होत आहे, असें त्यांना वाटलें. त्यांनीं लगेच धावत जाऊन ऋषींचे चरण धरले व ते त्यांची क्षमा मागूं लागले. "मला देहदंडाची शिक्षा करा, पण मुलाला शिक्षा देऊं नका" अशी त्यांनीं ऋषींना प्रार्थना केली. ते कांहीं केल्या ऋषींचे पाय सोडीनात. अखेर ऋषींची परीक्षा पूर्ण झाली कीं काय कोण जाणें, त्यांनीं सर्वांनीं आनंदानें एकमुखानें बैरागी महाराजांना सांगितलें, "आम्ही तुझीच वाट पहात होतों. हा तुझाच मुलगा आहे असें समज. तो आम्ही तुला दिला. जगाच्या कल्याणाकरितां याला वर नेऊन याचा सांभाळ कर."

असें म्हणून त्या मुलाला सर्वांनीं आशीर्वाद दिले. ऋषींचे आशीर्वाद घेऊन बैरागी महाराज मुलासोबत वर आले, तीच ही त्या वेळची जागा.


डोह

बैरागी महाराज त्या मुलाला 'सदाराम' म्हणूनच हांक मारीत आणि तो तेजस्वी व विरक्त मुलगा सुद्धां 'सदाराम' हाच नामोच्चार सदैव करीत असे. बैरागी महाराजांनीं कांहीं दिवसांनंतर आपली जीवनयात्रा संपविली.

**संत सदाराम महाराज :**

त्यानंतर मग सदाराम महाराजांनीं त्या पोरवयांतच बद्रिकेदार, द्वारका, रामेश्वर, पुरी या चारी धामांची यात्रा पायींच केली. ऋषिपुत्र सदाराम चारी धाम यात्रा करीत फिरत असतांना, त्यांना निरंजन महाराज भेटले. निरंजन महाराजहि श्रीदत्त-आज्ञेनें ऋषिपुत्र सदारामाचा शोध करीत होते. निरंजन महाराज हे महान् योगी पुरुष होते. त्यांची व सदारामांची भेट होतांच, खूण पटतांच श्रीनिरंजन महाराजांनीं सदारामाच्या डोक्यावर वरदहस्त ठेवून, त्याला गुरुमंत्र दिला.

त्यानंतर सदाराम महाराज फिरत फिरत नाचणगांवीं आले आणि गांवाबाहेर झोपडी बांधून राहूं लागले. त्यांचा आवडता छंद म्हणजे, सूर्योदयापूर्वीं बगीच्यांत फिरून निर-निराळीं बरींच फुलें आणावीं व त्या फुलांचे विविध अलंकार

करून ते देवाला घालावे. यामुळें गांवांतील लोकांना फुलें मिळेनाशीं झालीं. त्यांनीं सदारामांना फुलें तोडण्यास मनाई केली. तेव्हां महाराजांना खूप वाईट वाटलें. आतां आपणांस उद्यां फुलें मिळणार नाहींत, देवाला अलंकार घालतां येणार नाहींत, या एकाच चिंतेनें त्यांना घेरून टाकले. त्या वेळीं बाजूला पडलेली केरसुणी हातांत घेऊन---

**केरसुणी घेतली हातीं । त्यांतील एकच काडी काढती ।**
**हा गुलाब वृक्ष म्हणती । काडी रोवती पृथ्वींत ॥**

अशा रीतीनें केरसुणीच्या सर्व काड्या निरनिराळ्या सुवासिक सुंदर फुलांचीं नांवें घेऊन त्यांनीं जमिनींत रोवल्या आणि मग ते निश्चयी मनानें देवाची प्रार्थना करीत तन्मय होऊन बसले. तों काय आश्चर्य ! सूर्योदयापूर्वीं त्या सर्व काड्यांचीं सुंदर फुलझाडें दिसूं लागलीं. विविध रंगांचीं, सुवासांचीं फुलें, कळ्या फांद्याफांद्यावर डोलूं लागलीं. संध्याकाळपर्यंत जी जागा उजाड होती, तिथें फुलांनीं बहरलेला बगीचा एका रात्रींत तयार झाला. त्या फुलांचा गंध चौफेर पसरला. त्या गंधानें भारावून जाऊन गंधाचा शोध घेत गांवकरी डोळे चोळीतच बगीचा पहायला जमूं लागले. आणि प्रत्येक जण तें सुंदर दृश्य पाहून महाराजांसमोर येऊन नतमस्तक होऊं लागला. गांवकऱ्यांच्या हृदयांत वसणारा तिरस्कार, राग व महाराजांबद्दल ढोंगी म्हणून वाटणारा कुचेष्टा भाव विरून गेला. मग तेथील फुलांच्या सुवासाप्रमाणें महाराजांची कीर्तिहि सर्वत्र पसरूं लागली.

त्यानंतर दर्शनाला येणाऱ्या असंख्य लोकांमुळें त्यांना ईश्वरचिंतनाला वेळ मिळेनासा झाला. म्हणून तें गांव लगेच सोडून देऊन ते पुन: भटकूं लागले. त्यानंतर त्यांनीं पंचाग्निसाधना करायला सुरुवात केली. सभोंवतीं अग्नि पेटवून मध्यें बसून ईश्वरचिंतन करण्याची त्यांची ही पंचाग्निसाधना चालू असतांनाच फिरत फिरत ते वर्धेच्या कांठावरील बोरगांवला आले आणि तेथें राहूं लागले.

तेथें एक तरुण रंगारीण होती. तिची भक्ति सदारामांवर जडली. यांची पंचाग्निसाधना पाहून तर तिची श्रद्धा अधिकच वाढली. ती रोज नियमित त्यांच्या दर्शनाला येई, अन्न, दूध आणून देई. असें चाललें असतां कांहीं पाखंडी लोकांनीं तिच्या नवऱ्याच्या मनांत भलतें भरवून सदाराम महाराजांबद्दल त्याच्या मनांत द्वेष निर्माण केला. त्यानें आपल्या बायकोला खूप मारलें व दर्शनाला जाण्याची मनाई केली. तरी तिचें जाणें बंद होईना, म्हणून तिच्या नवऱ्यानें शेवटीं एके दिवशीं येन केन प्रकारेण सदारामाला मारावें, म्हणून खूप सरपण गोळा केलें. आपली बदनामी होऊं नये, आपल्यावर महाराजांना मारल्याचा आळ येऊं नये म्हणून, महाराजांच्या पंचाग्निसाधनेचें निमित्त त्यानें शोधलें.

तें जमविलेलें सर्व सरपण झोपडीसमोर चक्राकार रचून तो महाराजांना हिणवून रागानें म्हणाला, “ तो थोडासा विस्तव पेटवून साधना करायचें ढोंग करतां, त्यापेक्षां या सरपणा-वर बसा व दाखवा आपली साधना ! ” तें महाराजांनीं एकदम कबूल केलें. त्यानें रचलेल्या त्या सरपणाच्या ढिगावर ओला पंचा नेसून व पाण्यानें भरलेला कमंडलू घेऊन महाराज जाऊन बसले. आतां आपला दुष्ट डाव साधेल, या आसुरी आनंदानें त्यानें तें सरपण पेटवून दिलें.

लगेच चौफेर अग्नीच्या ज्वाळा उफाळूं लागल्या. सायंकाळीं महाराजांची सायंस्नानाची व सूर्याला अर्घ्यं देण्याची वेळ होतांच महाराज त्या उफाळत्या अग्नींतून ‘ हरि विठ्ठल ’ असा नामघोष करीत बाहेर निघाले. अंगावरील पंचा जसाच्या तसा ओलाच होता. कमंडलूंतील गार पाणी तसेंच गार होतें. हें पाहून लोकांची एकदम श्रद्धा बसली. नवलानें व भक्तीनें त्यांचीं मनें भारावून गेलीं. लगेच महाराज वर्धेच्या प्रवाहांत गेले. सायंस्नान आटोपून ते अर्घ्याच्या रूपानें अंगांतील सर्व दाह सूर्याला अर्पण करणार होते. त्यांनीं अर्घ्यं देण्याकरितां हातावर

पाणी घेतलें तोंच पश्चात्तापानें होरपळून गेलेला त्या रंगारिणीचा पति धांवत महाराजांच्या जवळ आला व एकदम त्यानें त्यांचे चरण घट्ट पकडले. तो क्षमा मागूं लागला. तो पाय सोडीना. महाराजांनीं अर्घ्य देण्याकरितां हातावर पाणी घेतलें होतें, म्हणून त्यांनीं खुणेनें त्याला दूर होण्याबद्दल बजावलें, पण तो तेथून हटेना. अखेर महाराजांच्या हातांतील अर्घ्याच्या पाण्यांतील कांहीं थेंब त्याच्या पाठीवर पडतांच तो जळून भस्म झाला. हें पाहून तर लोकांची खात्रीच पटली कीं, सदाराम हे महान् योगीपुरुष आहेत. लोकांच्या भक्तीला श्रद्धेनें अपार भरतें येऊं लागलें. महाराजांची कीर्ति वाऱ्याप्रमाणें पसरूं लागली.

**पंढरीकडे प्रयाण :**

या प्रकारानंतर महाराज लगेच तें गांव सोडून पंढरपुराकडे यावयास निघाले असतां कारंजा लाड (बिबीचे) येथें चातुर्मासांत राहिले. तिथल्या ईश्वरभक्त सोनाजीपंतांना, त्यांच्या वीणेवरील मधुर स्वरांतील नियमित हरिविजय-ग्रंथवाचनावर प्रसन्न होऊन आपला शिष्य करून घेतलें. प्रथम सोनाजींनीं ढोंगी साधु म्हणूनच महाराजांची ग्रंथवाचन ऐकण्याची इच्छा धुडकावून लावली. पण एके दिवशीं महाराजांच्या तीव्र इच्छेच्या प्रेरणेनें स्वतः वाजविलेल्या नगाऱ्याच्या आवाजानें सोनाजीपंत आपणहून महाराजांजवळ आले. त्यांनीं महाराजांना मधुर स्वरांत वीणेवर 'हरिविजय' ग्रंथ वाचून दाखविला. महाराजांनीं त्यांची पूजा केली व शिष्यत्वाची माळ त्यांचे आग्रहावरून गळयांत टाकली. तेव्हां महाराजांनीं त्यांचें नांव दीनानाथ असें ठेवलें. सोनाजीपंत स्वतः कवनें करीत. त्यांनीं त्याच वेळीं गुरुचरणीं आपल्या अभंगांतून भावफुलें वाहिलीं :

**आधीं प्रणिपात सदारामा करूं । मग बोलूं विस्तारूं विठ्ठलाचा ॥**
**विठ्ठलाचें नाम गाऊं आम्ही गोड । न धरोनी चाड इतरांशीं ॥**
**इतरांशीं काय संबंध आम्हांसी । परी गावूं तुजसी कैसें तरी ॥**
**कैसें तरी गावूं देवा तुझें नाम । दीना म्हणे काम टाकूनिया ॥**

## पंढरीच्या विठ्ठलाशीं हितगुज :

चार्तुमास संपल्यावर महाराज पंढरपूरला आले. तेथें ते बाळोधा बडवे यांचे घरीं राहिले. एके दिवशीं महाराज अचानक मध्यरात्रीं झोपेंतून जागे झाले; बाळोधा बडव्यास उठवून त्यांच्यापाशीं एक रुपया मागितला व घराबाहेर पडले. बडव्याला संशय आला कीं, मध्यरात्रींच्या वेळीं—आणि तोहि रुपया घेऊन महाराज जातात तरी कुठें ? या शंकेनें तोहि महाराजांमागोमाग लपत छपत जाऊं लागला. महाराजांनीं रस्त्यावरच्या हलवायाला उठवून त्या रुपयाची मिठाई घेंतली व ते तडक विठ्ठलमंदिराच्या महाद्वारीं आले. महाद्वाराला भलें मोठें कुलूप लावलेलें होतें. त्या कुलुपाला स्पर्श करतांच तें गळून पडलें. दारें उघडलीं गेलीं. महाराजांनीं राउळांत जाऊन पांडुरंगाच्या चरणीं मस्तक ठेवलें. तोंच साक्षात् विठ्ठलानें प्रकट होऊन सदारामास दृढालिंगन दिलें. त्यानंतर पांडुरंग आपल्या या परम भक्तास म्हणाले—

**म्हणे कैसें काय झालें । तुज मीं दुःख दिलें ॥**
**आजी बहु संतापिलें । क्रोधाविलें मानस ॥**
**क्षुधा लागली माझे पोटीं । तूं तर बोलसी बहु गोष्टी ॥**
**सदारामानें सोडूनी गांठी । लावली ओठीं मिठाई ॥**
**विठ्ठल स्वतः बोलती जाण । तुम्ही बहुताचि झाले क्षीण ॥**
**तरी आजपासूनी आपण । स्वइच्छेनें वागावें ॥**

त्यानंतर विठ्ठलानें आपल्या भक्तास दिलासा देत आज्ञा केली—

**तरी ऐकावें निर्धारीं । वसिष्ठातीरीं कौंडण्यपुरीं ।**
**क्षेत्र जुनाट असे भारी । तेथें करी तूं राहिवास ॥**
**कार्तिक शुद्ध चतुर्दशीपासून । मी स्वयें येईन दिवस तीन ।**
**दहीहांडी झालिया निघोन । परतोनी जाईन मी ॥**

पांडुरंगानें असें वरदान देऊन आपल्या सासुरवाडीच्या गांवीं सदारामास तीर्थक्षेत्र स्थापण्याची आज्ञा दिली. तेव्हां सदारामानें देवाची प्रार्थना केली कीं, आपला वियोग न व्हावा म्हणून कांहीं तरी खूण द्यावी. तेव्हां–

**स्वधातुमूर्तीतें दिधलें । स्वहस्तें विठ्ठलानें ॥**

महाराज ती मूर्ति घेऊन बडव्याच्या घरीं परत आले. बडवा त्याआधींच नवल करीत, आपण थोर साधुपुरुषाविषयीं नसती शंका घेतली, असा पश्चात्ताप करीत, दैवाला दोष देत, घरीं येऊन शंका येऊं नये म्हणून झोपेचें सोंग करून पडला. थोड्याच वेळांत महाराज आले. त्यांनीं बडव्यास जोरानें हांका मारल्या, पण तो लवकर उठलाच नाहीं. कांहीं वेळानें दार उघडलें. महाराज आंत येतांच त्यास म्हणाले " आतां तूं कांहीं चमत्कार पाहिलास का ?" तो खोटें बोलूं लागला. तेव्हां महाराज त्यावर रागावले. तेव्हां बडव्यानें सर्व कबूल केलें व क्षमा मागितली. महाराजांनीं त्याला बजावून ठेवलें कीं, "तूं जें पाहिलें, ऐकलेंस, तें कुणालाहि सांगूं नकोस. जर सांगशील तर बहिरा व मुका होशील." त्यानंतर लगेच सदाराम महाराज पांडुरंगाच्या आज्ञेप्रमाणें कौंडण्यपुराकडे निघाले.

कांहीं दिवसांनंतर जेव्हां पंढरपुरांत लोक महाराजांबद्दल भलतेंसलतें बोलूं लागले, त्यांची खूप निंदानालस्ती करूं लागले, तेव्हां मात्र बाळोधा बडव्याला तें सहन होईनासें झालें. अखेर एके दिवशीं रागाच्या भरांत त्यानें स्वतः पाहिलेलें व ऐकलेलें सर्व सांगून टाकलें. त्याबरोबर तो बहिरा व मुका झाला. तेव्हांपासून त्याच्या वंशजांना ' बहिरट ' हेंच नांव पडलें.

## कौंडण्यपुरास आगमन व यात्रारंभ :

११३९५

पंढरपुरावरून परत येतांना कारंजा लाड येथें कांहीं वस थांबून सदाराम महाराज कौंडण्यपुरास आले. आपण

सध्यां जें विठ्ठलमंदिर पाहतों तें त्यांनींच त्या वेळीं बांधलेलें. त्यांत स्वत: पांडुरंगानें दिलेल्या स्वत:च्या धातुमूर्तीची स्थापना महाराजांनीं केली आणि विठ्ठलानें सांगितल्याप्रमाणें कार्तिक शुद्ध चतुर्दशीपासून यात्रा भरविण्यास सुरुवात केली. त्यामुळें ईश्वरभक्तीच्या ज्योति हृदयाहृदयांतून उजळूं लागल्या. पांडुरंगाची भक्ति घराघरांतून होऊं लागली. पौराणिक काळांतील विदर्भदेशींची गौरवशाली कुंडिननगरी–तिची पुरातन पवित्रता व दिव्यता नव्यानें आसमंत उजळूं लागली.

तेव्हांपासून येथें फार मोठी यात्रा भरते. वर्धेचें विशाल वाळवंट, टेकड्या 'पुंडलिकवरदा हरि विठ्ठल' या नामघोषानें पंढरपुराप्रमाणें दुमदुमून जातात. सध्यां देखील यात्रेच्या वेळीं व विशेषत: प्रतिपदेला समाप्ति म्हणून दहीहांडी-काला होतो. त्या दिवशीं तर दोन ते तीन लाखांपर्यंत लोकांचा मेळावा जमतो आणि प्रसाद घेऊन परततो. ही यात्रा चतुर्दशीला सुरू होऊन प्रतिपदेला संपते.

त्यानंतर पुन: आषाढी पौर्णिमेला यात्रा सुरू होऊन ती तीन दिवस चालते. तिसरे दिवशीं दहीहांडी-काला होतो व मग यात्रा संपते. या वेळीं मात्र लोकसमुदाय पहिल्यापेक्षां थोडा कमी असतो. दोन्ही यात्रांच्या वेळीं सतत तीन दिवस पीतांबराची काकडज्योत जळत असते.

याशिवाय येथें आणखीहि उत्सव साजरे होतात. ते म्हणजे गिरिजेचें नऊ दिवसांचें नवरात्र व रामनवमी. याहि वेळीं येथें यात्रेचें स्वरूप येतें. आजूबाजूचे बरेच लोक जमतात.

**निर्वाणकाळ :**

सदाराम महाराजांनीं असे निरनिराळे यात्रोत्सव कोंडण्यपूरला सुरू केले. ईश्वरभक्तीची पेरणी खेड्यापाड्यांतून, घराघरांतून केली. सत्प्रवृत्तींना अनंत हृदयांत जागविलें. अशा

रीतीनें सारें वातावरण भक्तिमय केल्यावर कांहीं काळानंतर एके दिवशीं जमलेल्या आपल्या भाविक भक्तांना त्यांनीं अचानक असह्य दुःखाचा हादरा दिला.

**इकडे सर्वां सांगितलें। कीं आम्हां बोलावणें आलें।**
**तरी ऋणानुबंध सरले। जाणें आलें सहजाचि॥**
**परी दीनानाथ आल्याविण। मी न सोडी प्राण।**
**घ्या बोलावूनी लवकरी॥**

हें त्या भाविक भक्तांनीं ऐकतांच महाराजांच्या होणाऱ्या वियोगानें ते अतिशय दुःखी झाले. 'दीनानाथ आले नाहींत तरच बरें' असेंहि कित्येकांना वाटल्यावांचून राहिलें नाहीं. पण निरोप मिळतांच दीनानाथ कारंजावरून कौंडण्यपुरास आले. दीनानाथ येतांच महाराजांनीं त्यांना सांगितलें कीं, "आतां उदईक मी हा जड देह विसर्जन करणार आहें. यापुढें माझ्या पश्चात् तूं माझी गादी चालवावीस."

दुसरा दिवस उजाडण्यापूर्वीं म्हणजे ज्येष्ठ शु॥ १३ शके १६८८ रोजीं (सन १७६६ सालीं) सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं जड देह विसर्जन केला. या इहलोकाचा त्याग करून ते पांडुरंगचरणीं विलीन झाले.

महाराजांच्या निर्वाणासंबंधींची बातमी ऐकून बालाघाट येथें राहणारे महाराजांचे भक्त यशवंत दामाजी शेवटची भेट म्हणून महाराजांकरितां चांगला भारी किमतीचा पीतांबर-जोडा, भरजरीचें अष्टकोनी पागोटें व इतर कांहीं पूजासाहित्य घेऊन घाईघाईनें कौंडण्यपुरास आले. यशवंत दामाजींच्या सर्वांगावर कुष्ठरोग फुटला होता, तो महाराजांच्या कृपेनें पूर्ण बरा झाला. त्यामुळें त्यांची महाराजांवर खूप श्रद्धा होती.

ते जेव्हां कौंडण्यपुरास येऊन पोहोंचले तेव्हां महाराजांच्या जडदेहाला अग्नि देण्याची तयारी चालू होती. यशवंत दामाजींना महाराजांचें दर्शन झालें नाहीं, याचें खूप दुःख झालें.

त्यांनीं आणलेलें साहित्य दीनानाथ महाराज त्यांच्याकडे मागूं लागले तेव्हां त्यांनीं दीनानाथांना ढोंगी ठरवून तें सर्व साहित्य त्यांना न देतां--

**प्रेता नेसविलें महावस्त्र । मंदील आणि जरतारी धोत्र ।**
**उपवस्त्र जरतारी ॥**
**तव अग्नि चेतविला त्या वेळे । झालें दहन देहाचें ॥**
**अग्नि स्पर्शेना वस्त्रांशीं । नवल वाटलें हो सर्वांशीं ।**
**वस्त्रें निघालीं जशींच्या तशीं । डाग वस्त्रांसी लागेना ॥**

निर्वाणानंतरहि महाराजांनीं आपल्या शिष्याबद्दल कोणाच्याहि मनांत कुतर्क येऊं नये म्हणून व त्यांच्या द्वारा आपलें भक्तीचें पवित्र कार्य पुढेंहि चालू रहावें म्हणून असा प्रत्यय जमलेल्या सर्व भाविक भक्तांना दिला. तेव्हां यशवंत दामाजींनीं दीनानाथांची क्षमा मागून त्यांना तें सर्व साहित्य अर्पण केलें. त्याची आठवण म्हणून अजूनहि यात्रोत्सवाच्या वेळीं तीन दिवसपर्यंत पीतांबराची काकडज्योत जाळतात.

## नित्यनैमित्तिक कार्यक्रम :

सर्व प्रमुख मंदिरांतून रोज पहांटे त्या त्या देवतांच्या आरत्या होतात. दुपारीं देवळांतील व्यवस्थापक नैवेद्य दाखवितात आणि सायंकाळीं पुन: सकाळप्रमाणें आरतीचा कार्यक्र म होतो. जर कुणी साधुसंत किंवा भजनीमंडळी तिथें आली तर त्याप्रमाणें विठ्ठलाच्या देवळांत कीर्तन, भजन, प्रवचन असा कार्यक्रम होतो. चार्तुमासांत मात्र दरवर्षीं नियमितपणें ग्रंथवाचनाचा कार्यक्रम होत असतो.


येथून दरवर्षीं नियमितपणें रुक्मिणीमातेची पालखी ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेला निघून ती बरोबर आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहोंचते. पंढरपुरांत या पालखीला अग्रमान असतो. आणि ठरलेल्या संकेताप्रमाणें बरोबर गोकुळअष्टमीला ती परत कौंडण्यपुरास येऊन पोहोंचते.

आपण समाधीचें दर्शन घेऊन समाधींत चिरनिद्रा घेणाऱ्या संत सदारामांच्या सुखद स्मृतींशीं आतांपर्यंत तन्मय झालों होतों. आपण नंतर विठ्ठलाचें दर्शन घ्यायला मोठ्या आनंदोत्कट हृदयानें उठतों. स्वतः विठ्ठलानें दिलेल्या आपल्या धातुप्रतिमा पहायला अधीर झालेलें आपलें मन, त्यांच्या दर्शनानें अपूर्व सौख्य मिळेल या आशेनें भारावलेलें आपलें मन आंत देवळांत प्रवेश करून देव्हाऱ्यांतील मूर्ति पाहून एकदम निराश होतें. आणि आपण संभ्रमांत पडतों कीं, देव्हाऱ्यांत दिसणाऱ्या व विठ्ठल-रखुमाई म्हणून कांहींशा भासणाऱ्या या समोरच्या पांच-सहा लहानमोठ्या मूर्ति भीमक-परिवाराच्या प्रतीक-प्रतिमा तर नाहींत ना ? कारण आपण यापूर्वीं विठ्ठलाच्या मंदिरांत विठ्ठल-रखुमाई या दोन मूर्तींशिवाय तिसरी मूर्ति कुठेंच पाहिलेली नसते. म्हणूनच नवल वाटूं लागतें.

तोंच देव्हाऱ्यालगत खालीं असलेल्या विष्णुपदाचें दर्शन होतें. हें विष्णुपद फार पुरातन आहे असें म्हणतात. असें असलें तरी विठ्ठल-रखुमाई म्हणूनच त्यांचीच पूजाअर्चा भाविक जन करतात. कांहीं अंशीं देव्हाऱ्यांतील मूर्तींबद्दलची शंका दूर होते व आपणहि नतमस्तक होतों. ह्या देवळाच्या मागेंच यात्रेकरूंकरिता श्री तुकडोजी महाराजांनीं कांहीं खोल्या बांधलेल्या आहेत. तिथें भांडींकुंडीं इत्यादि सर्व सामान मिळूं शकतें. त्याच्याच मागें एका दानशूरानें बावीस खोल्यांची मोठी धर्मशाळा यात्रेकरूंसाठीं बांधलेली आहे.


त्यानंतर लागूनच विस्तीर्ण आवारांत, महादेवाचें एक जुनें देऊळ आहे. त्याखालीं भुयाराप्रमाणें भाग आहे. कदाचित् तें योग्यांचें ध्यानस्थ बसावयाचें ठिकाण असावें. या देवळाची व्यवस्था सध्यां श्री अवचित महाराज सांभाळतात. मिळेल त्या उदार देणगीवर ते आवारांत यात्रेकरूंकरितां खोल्या बांधीत आहेत. ते मोठ्या आस्थेनें यात्रेकरूंचें स्वागत व व्यवस्था करतात. महादेवाच्या देवळाला लागूनच जैनमंदिर पाहून मनाला नवल

वाटतें. त्यानंतर महादेवाच्या आवारांतच सुंदर घाटणीचें ५० वर्षांपूर्वी श्री. लल्लुगीर गो स्वामी—लाडेगांव यांनीं बांधलेलें



महादेवाचें देऊळ

श्रीदत्ताचें मंदिर आहे. आंतील रेखीव मूर्ति पाहून मन सुखावतें. तिथें जवळच उत्खननांत सांपडलेली आणखी एक रेखीव मूर्ति आपणांस पुरातन शिल्पकलेची साक्ष देते. त्यानंतर आपण मागच्या भागानें गेलों तर श्रीलोटांगण महाराजांचें निवासस्थान असलेलें लहानसें देऊळ लागतें. तेथें



दत्तमंदिर

महादेवाची भावपूर्ण पंचमूर्ति असलेली पिंड पाहून प्रसन्नता वाटते. या देवळाखालींहि भुयाराप्रमाणें भाग आहे. तेथली व्यवस्था लोटांगण महाराज पहातात. आज ते वृद्धावस्थेंत आहेत, पण त्यांनीं आजपर्यंत दरवर्षीं नियमितपणें येथून तें पंढरपुरापर्यंत लोटांगणें घालीत जात वाऱ्या केलेल्या आहेत. हें ऐकून आपण तर आश्चर्य पावतों. विठ्ठलाच्या अपूर्व भक्तीचें आणि कठोर साधनेचें प्रतीक म्हणजे लोटांगण! महाराज आज दारोदारीं फिरून भिक्षा मागतात व जमलेलें सर्व अन्न लुळ्या-पांगळ्यांच्या पदरांत टाकतात. हा त्यांचा नित्यक्रम आहे.

त्यानंतर आपण वळसा घेऊन लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत येतों. देवळाची व्यवस्था मनाला खटकते. पण आंतली चतुर्भुज शंख–चक्र–गदा–कमळधारी चकाकणारी, संगमरवरी मूर्ति पाहून आपण ती घडविणाऱ्या शिल्पकाराला धन्यवाद देत बाहेर पडतों.

त्यानंतर तेथून बाजूच्या टेकड्यांवर दिसणाऱ्या वेगवेगळ्या तीन देवळांकडे आपण कुतूहलानें पाहतों. बहुधा आजवर आपण कुठेंच न पाहिलेलें, न ऐकलेलें नवल म्हणजे तीं तीन देवळें! हरिजन-चांभार व मातंग बांधवांनीं बांधलेलीं स्वतंत्र देवळें व त्यांत अजूनहि विठ्ठल-रखुमाईच्या प्रतिमा पाहून मन हर्ष-नवलमिश्रित बनतें. असें दृश्य बहुधा कोणत्याहि तीर्थक्षेत्रांत आढळणार नाहीं.

सदाराम महाराजांनीं पांडुरंगाच्या आज्ञेनें नव्यानें निर्माण केलेलें कौंडण्यपुर तीर्थक्षेत्र आणि त्याच्या परिसर व आसमंत यांतील खेड्यांतून-घराघरांतून भक्तीचा महिमा वाढविला. त्यांनींच कौंडण्यपुरास विदर्भांतली प्रतिपंढरी या लौकिकास नेलें. घराघरांतून आपली श्रद्धापूर्वक होणारी भक्तिपूजा पाहून विठ्ठल-रखुमाई तेथील तीन दिवसांच्या वास्तव्यांत कौतुकानें–आनंदानें भारावून जात असतील आणि त्यांना ही सारी पुण्याई

आपल्या परमभक्त सदारामाची आहे असें वाटल्यावांचून रहात नसेल! विदर्भाला भक्तिमय करणारे व पौराणिक काळानंतर कौंडण्यपुराला पवित्र तीर्थक्षेत्राचा अपूर्व गौरव प्राप्त करून देणारे संत सदाराम धन्य होत.

**कौंडण्यपुरास जाण्याचे मार्ग :**

कौंडण्यपुरास जाण्यासाठीं दोन-चार मार्ग आहेत. प्रॉव्हिन्शिअल ट्रान्स्पोर्टच्या मोटारीनें अमरावतीहून चांदूर-कुन्हा या मार्गानें थेट कौंडण्यपुरास जातां येतें. मोटारचा दुसरा रस्ता अमरावती-आर्वी ते देऊरवाडा असा असून तें अंतर ५२ मैलांचें आहे. मात्र देऊरवाड्याला गेलें म्हणजे तेथें वर्धा नदी ओलांडून पैलतीरीं कौंडण्यपुराला जाऊन पोहोंचावें लागतें.

रेल्वेनें जावयाचें म्हटलें तर अमरावती-चांदूर रेल्वे-कुन्हा आणि पुढें मोटारीनें ६४ मैल जाऊन कौंडण्यपूर गांठतां येतें. रेल्वेचा दुसरा मार्ग मोटारप्रमाणेंच आर्वी-देऊरवाडा (५२ मैल) आणि तेथून नदी ओलांडून पैलतीरावर कौंडण्यपूर असा आहे.

* * *

११३८५